CNR No- MHPU100000262026

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पी.सी.एम.सी. न्यायालय, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयासमोर
रे. दि. मु. नं. २५/२०२६ सीएनआर नं.एमएचपीयु–१० ००००२६–२०२६
श्रीमती हरीबाई हनुमंत जमदाडे तर्फे कुलमुखत्यार धारक सतिष जमदाडे
वि.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर

निशाणी क्र.५ वरिल आदेश.

(पारित दिनांक २१/०७/२०२६)

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश मिळण्याकरता केलेला आहे.

०२. **वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः**

मिळकतीचे वर्णनः मौजे थेरगाव येथील सर्वे नं. ३९/७, सिटी सर्वे नं. २५२५ यासी क्षेत्र ०० हे ०२ आर बांधीव घर मिळकत क्र. ६०७/२/१ व घरामागील ८' बाय ६६' एकुण ५२८ चौ. फु. व घराच्या बाजुची मोकळी जागा ५२८ चौ. फु. आहे यांसी चतुःसिमाः

पुर्वेसः रस्ता,
दक्षिणेसः सैनिक भिमराव शिंदे यांची मिळकत,

पश्चिमेसः सर्वे नं. ३९/६ मधील संभाजी पालवे, गेणू पालवे व श्री शर्मा यांची मिळकत,
उत्तरेसः श्री मीना दिलीप मातेरे यांची मिळकत.

(वर नमूद मिळकतीस यापुढे **'वाद मिळकत'** संबोधण्यात येईल.)

०३. वादी असे कथन करते की, वाद मिळकत ही तिच्या पतीने सन १९८५ साली सावित्री सोपान गुजर यांच्याकडून खरेदीखत दस्त क्र. ३३२३/१९८५ क्षेत्र २ गुंठे जागा घेतलेली आहे. सन १९८६ सालापासून वादी व त्यांचे कुटुंब अव्याहतपणे वाद मिळकतीमध्ये राहत आहेत व तेव्हापासून आजतागायत त्यांची प्रत्यक्ष वहिवाट व ताबा आहे. त्यांच्या मृत्यूनंतर वाद मिळकत ही वादी यांच्या नावे झालेली आहे.

०४. वादी पुढे असे कथन करते की, त्यांनी त्यांच्या घराच्या मागील जागेमध्ये स्वतःच्या वापरासाठी ड्रेनेजची सोय केलेली होती. सदरील ड्रेनेज हे वादीच्या वैयक्तिक व खाजगी जागेत होते. वादीने त्यांची ड्रेनेज लाईन पुढे मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडली असल्यामुळे सदरच्या ड्रेनेजची वादीस आवश्यकता नव्हती. वादीच्या घरामागे मागील बाजूस सर्वे नं. ३९/६ येथे प्रतिवादी क्र. ७ व ८ राहतात. प्रतिवादी क्र. ८ यांच्या घरातील ड्रेनेज ब्लॉक झाल्याने त्यांनी जलनिस्सारण विभागाला त्यांचे ड्रेनेज तुंबले बाबत अर्ज केला होता. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या घरासमोर पिंपरी चिंचवड महापालिकेचे १०० फुटापेक्षा कमी जागेत साधारण १० फुटापर्यंत मनपाची ड्रेनेज लाईन आहे. प्रतिवादी क्र. ८ श्री. पालवे यांच्या अर्जाबाबत जलनिःस्सारण 'ग' विभागाने त्यांचे ड्रेनेज त्यांच्या घरातुन साफ न

करता वादीला दिनांक १७/०२/२०२६ रोजी पत्र दिले की, संभाजी पालवे यांचे ड्रेनेज साफ करण्यासाठी तुमच्या जागेतुन जाण्याची परवानगी द्या. त्यावर वादीने परवागनी देवू शकत नाही. पालवे यांच्या घरातुन त्यांचे ब्लॉक झालेले ड्रेनेज साफ करा, असे लेखी म्हणणे दिले. तसेच, गेल्या दोन महिन्यांपासून वादीच्या मालकी हक्काच्या जागेत येवुन प्रतिवादी मनपा व त्यांचे कर्मचारी येवून, 'ही जागा कार्पोरेशनची आहे', अशी धमकी देत होते. तसेच, ''तुम्ही आम्हांला ड्रेनेज लाईन टाकून नाही दिली तरी तुमच्या खाजगी जागेत अतिक्रमण विभागाची मदत घेऊन, ड्रेनेज लाईन टाकेल'', अशी धमकी दिली.

०५. वादी असे कथन करते की, वास्तविकतः वादीच्या जागा संपादनाबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कार्यालयाकडून कुठलीही नोटीस नाही. दिनांक ०४/०६/२०२६ रोजी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांच्यासहीत कॉन्ट्रॅक्टर व त्यांचे मजूर, प्रतिवादी क्र. ६ हे पोलीसांसह वादीच्या जागेत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी त्याचदिवशी व्हॉटसअॅपवर नोटीस पाठवली. दिनांक ०४/०६/२०२६ रोजीची नोटीस बेकायदेशीर आहे. वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी आल्यास वादीच्या मालकी हक्काच्या मोकळया जागेमध्ये येण्याचा प्रतिवादींना कुठलाही अधिकार नाही. त्यामुळे वादी यांस प्रथमदर्शनी केस असुन दिनांक ०४/०६/२०२६ रोजीचे नोटीस रद्द करावी आणि वाद मिळकतीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या हरकत, अडथळा निर्माण करु नये, अशा कायमस्वरुपीचा मनाई हुकुम व दिनांक ०४/०६/२०२६ रोजीची दिलेल्या नोटीसीच्या

कारवाईस तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात यावा. म्हणून सदरचा अर्ज त्यांनी दाव्यासोबत दाखल केला आहे.

०६. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी हजर होवुन निशाणी क्र. ३७ वर एकत्रीतपणे लेखी जबाब व खुलासा सादर केला. त्यांनी वादींची सर्व कथने नाकारली व अधिकच्या जबाबात असे कथन केले की, वादी व प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या घराच्या मध्ये जुनी ड्रेनेज लाईन असुन ती ड्रेनेज लाईन प्रतिवादी क्र. १ पिं. चिं. मनपा यांनी बांधलेली व ती फार पुर्वीपासून अस्तित्वात आहे. सदरची ड्रेनेज लाईन ब्लॉक झाल्यामुळे ते ब्लॉकेज काढण्यासाठी जी तक्रार आली होती, त्या तक्रारीनुसार ब्लॉकेज काढणे आवश्यक आहे. परंतु, वादी त्यास अडथळा निर्माण करीत असुन ड्रेनेज लाईन गेलेल्या ठिकाणी वादीने भिंत बांधलेली आहे व अडथळा निर्माण केला. वादी यांना कुठलीही केस नसुन त्यांचा अर्ज दाव्यासह नामंजुर करावा, असा युक्तीवाद केला.

०७. प्रतिवादी क्र. ८ यांनी निशाणी ४३ वर लेखी जबाब व खुलासा दाखल केला व पुरसिस निशाणी ५८ व्दारे प्रतिवादी क्र. ५, ६, ७ यांनी दिलेला खुलासा स्विकारला. वादींची सर्व कथने त्यांनी नाकारली व अधिकच्या जबाबात वादीला दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. दावा दाखल करण्यास कुठलेही कारण घडलेले नसुन सदरच्या दाव्यास मिसजॉईंडर ऑफ पार्टी व नॉन जॉईंडर ऑफ पार्टी या तत्वाची बाधा होते व अधिकच्या

जबाबात असे कथन केले की, वादी यांनी २०२ चौ. मी. पेक्षा अधिक कोणतेही क्षेत्र खरेदी केलेले नाही. मात्र, दाव्यामध्ये वाढीव १०५६ चौ. फुट मिळकतीचे वर्णन केलेले आहे.

०८. प्रतिवादी क्र. ८ पुढे असे कथन करतात की, सर्वे नंब. ३९/६ म्हणजेच सी. टी. एस. क्र. २५२४ मध्ये असलेल्या प्रतिवादी व इतर सहहिस्सेदारांच्या मालकीच्या मिळकतीच्या पुर्व बाजुस असलेल्या मोकळया जागेत पुर्वीपासून सुमारे २५ वर्षापेक्षा जास्त काळापासून सरकारी ड्रेनेज लाईन अस्तित्वात होती आणि सदर ड्रेनेज लाईनचे रिपेयर, मेन्टेंन्स गेल्या २५ वर्षापासून प्रतिवादी क्र. ४ करीत आहेत. त्यास आजतागायत वादी अथवा सर्वे नं. ३९/७ च्या इतर कोणत्याही रहिवाश्यांनी हरकत घेतली नव्हती. सदर ड्रेनेज लाईन चोकअप झाल्यामुळे प्रतिवादी क्र. ८ व इतर रहिवाशी यांच्या घरामध्ये सदर ड्रेनेजचे घाण पाणी येत होते व आजुबाजुंच्या लोकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यांनी सदर ड्रेनेजच्या दुरुस्तीचे काम सुरु होते व त्यानुसार सर्वे नं. ३९/६ मधील दक्षिण उत्तर दिशेतील ड्रेनेज लाईनचे अर्धे काम पुर्ण केले होते. त्यानंतर वादी यांनी दुरुस्तीच्या कामास अडथळा केला व ते काम थांबवले. त्यामुळे वादी यांना कुठलीही प्रथमदर्शनी केस नसुन वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आले नाही. त्यांनी न्यायालयापासून काही बाबी लपवून ठेवल्या. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा, असा युक्तीवाद केला.

०९. वादी तर्फे अधिवक्ता श्रीमती दमदाडे, प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे अधिवक्ता श्री. भापकर व प्रतिवादी क्र. ५ ते ८ तर्फे अधिवक्ता श्री. गायकवाड यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यासाठी या न्यायालयासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादी अर्जदारास प्रथमदर्शनी केस असल्याचे वादीने सिध्द केले काय ?	... नकारार्थी.
२.	दाव्याचा कल वादीचे बाजूने आहे काय ?	...नकारार्थी.
३.	वादीने हे सिध्द केले काय की, अर्ज नामंजूर झाल्यास त्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल ?	...नकारार्थी.
४.	आदेश काय ?	... अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमिमांसा

वादीतर्फे युक्तीवाद :–

१. ड्रेनेज हे वादीच्या वैयक्तिक व खाजगी जागेत आहे.

२. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या घरासमोर मनपाची ड्रेनेज लाईन आहे.

३. मनपाने त्यांची जागा आहे किंवा वादीने अतिक्रमण केले आहे, असे कोणतेही कागदपत्र प्रतिवादी क्र. ४ मनपाने दिलेले नाहीत.

४. वादीची सिमाभिंत जाणुनबुजुन पाडून प्रतिवादी अतिक्रमण करु पाहत आहेत.

५. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना ड्रेनेज पुढे जोडण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

<u>प्रतिवादीतर्फे युक्तीवाद :-</u>

१. दावा मिळकतीचे योग्य वर्णन केलेले नाही.

२. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या पुर्व बाजुला असलेल्या मोकळया जागेत २५ वर्षापासून ड्रेनेज लाईन अस्तित्वात आहे.

३. ड्रेनेज लाईनचे ब्लॉकेज न काढल्यास दुर्गंधी पसरेल व लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल.

४. मनपाला ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे हक्क व अधिकार आहेत.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता</u> –

१०. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विश्लेषणाकरिता व निर्णयाकरिता त्यांना एकत्रितरित्या चर्चेस घेण्यात येत आहे. सर्वप्रथम वादींना असे सिध्द करावयाचे आहे की, त्यांना प्रथमदर्शनी केस आहे, दाव्याचा समतोल सुध्दा त्यांचे बाजुला आहे, तसेच सदर अर्ज नामंजूर झाल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होईल.

११. संपुर्ण अभिलेख पाहिला. दोन्ही बाजुंच्या कागदपत्रांचे सुक्ष्म अवलोकन केले. सदरचा दावा हा वादीने ठराव तसेच, निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सर्वप्रथम वादीचा तात्पुरता मनाई हुकुमाच्या अर्जातील विनंती कलमाचे अवलोकन केले असता त्यांनी कलम १६ मध्ये सहा मागण्या केल्या आहेत. त्यापैकी फक्त विनंती कलम 'ड' मधील मजकूर हा तुर्तातुर्त मनाई संदर्भात आहे व इतर विनंती कलम जसे की, नोटीस रद्द करुन ती बेकायदेशीर आहे असा ठराव करुन मिळावा, निरंतर मनाई हुकुम

मिळणे, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी ड्रेनेज पुढे जोडुन घेण्याबाबत मॅन्डेटरी मनाई हुकुम देणे, हया मागण्या तात्पुरत्या नसुन त्यांचा विचार दोन्ही बाजुंचा पुरावा ऐकल्यानंतर गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल. त्यामुळे त्याचा विचार येथे करण्यात येत नाही. त्याकरीता, विस्तृत पुराव्याची आवश्यकता आहे. सदयस्थितीत फक्त दिनांक ०४/०६/२०२६ रोजी प्रतिवादी यांनी दिलेल्या नोटीसवर तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात यावा की नाही एवढाच आहे.

१२. दिनांक ०४/०६/२०२६ रोजीची नोटीस ही दस्तऐवज निशाणी ३/४ वर दाखल आहे. त्याचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता, ती दिनांक ०४/०६/२०२६ रोजीची नसुन दिनांक ०३/०६/२०२६ रोजीची कलम १५५ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम अंतर्गत दिलेली आहे. त्या नोटीशीनुसार वादीने जल-निसारण वाहिनीवर केलेले अतिक्रमण काढुन घेण्याबाबत कळवले आहे. त्यानुसार प्रतिवादी यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली असता, सदरच्या ठिकाणच्या असलेल्या ड्रेनेज लाईनवर दोन्ही बाजुकडुन प्रवेश करताना एक साईडनचे लोखंडी ग्रील तर, दुस-या बाजुने भिंत बांधून त्यावर लोखंडी गेट केल्यामुळे ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्यास अडथळा निर्माण झाल्याचे व अतिक्रमण निष्कासित करण्याचे कळविण्यात आले होते. तसेच, ड्रेनेज तुंबलेले असून आजुबाजुंच्या परिसरात अनारोग्य कारक परिस्थिती निर्माण झाली असल्याने ती ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून त्या ड्रेनेज लाईनवरचे गेट स्वतः काढून घेणे व

अडथळा काढून घेण्याबाबत कळविले आहे.

१३. वादी अशी केस घेवून आलेले आहेत की, सदरील ड्रेनेज हे वादीचे वैयक्तिक व खाजगी जागेत आहे व पुढे मनपाचे ड्रेनेज लाईन त्यांचे खाजगी ड्रेनेज जोडले आहे. जर वादी स्वतःहुन असे म्हणत आहे की, ड्रेनेज हे त्यांचे खाजगी आहे तर, तशा प्रकारचा प्रथमदर्शनी पुरावा सादर करणे आवश्यक होते. परंतु, ते ड्रेनेज खाजगी असल्याबाबत एकही दस्त दाखल नाही. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या फोटोवरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी या दोघांच्या घरामागे काही जागा सोडलेली आहे व त्यामध्ये ड्रेनेज बांधलेले आहे. ते ड्रेनेज हे वादी व प्रतिवादी यांच्या घरापुरतेच नसुन पुढे व मागे आणखीनही ब–याच रहिवाश्यांच्या घरामागे कमी अधिक प्रमाणात त्यांनी त्यांच्या मालकीच्या जागेतील जागा सोडलेली दिसत आहे. कारण प्रतिवादी मनपाच्या वकीलांनी सुध्दा युक्तीवाद केला की, ते ड्रेनेजचे काम ब–याच वर्षापुर्वीचे असल्याने त्या ड्रेनेजकरीता जागा संपादित केल्याबाबत कागदपत्रे उपलब्ध नाहीत. सदर सर्वे नं. ३९/७ मधील रहिवाश्यांनी प्रत्येकाने आपापल्या मालकीची थोडी–थोडी जागा सोडुन त्यामध्ये मनपाने ड्रेनेज लाईन टाकलेले आहे व ती ब–याच वर्षापासून अस्तित्वात आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या युक्तीवादामध्ये तथ्य दिसुन येते.

१४. वादी यांनी आणखी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या

घरासमोरच नवीन ड्रेनेज लाईन झालेले आहे व त्यामध्ये प्रतिवादी क्र. ७ व ८ त्यांचे ड्रेनेज जोडू शकतात, त्यांना वादीच्या मालकीच्या जागेमध्ये येण्याचा अधिकार नाही. परंतु, याचा अर्थ असा होत नाही की, नवीन ड्रेनेज लाईन झाली म्हणजे अगोदरच्या ड्रेनेज लाईनचा उपयोग करु नये. त्यामुळे वादीच्या युक्तीवादामध्ये तथ्य दिसुन येत नाही. वादीने दाखल केलेली दिनांक २०/०२/२०२६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, तो अर्ज वादीचे वडील हनुमंत जमदाडे यांनी केल्याचे दिसुन येते. वास्तविकतः कलम १५५ नुसार आयुक्त यांना नाला/ड्रेनेज बांधण्याचे संपुर्ण अधिकार दिलेले आहेत. अवलोकनाकरीता, कलम १५५ मधील तरतुद पुढीलप्रमाणे–

१५५– नाल्या बांधण्याचे अधिकार–

१. आयुक्तास, कोणतेही नगरपालिकेची नाली कोणत्या रस्त्यामधून किंवा रस्ता म्हणून रेखाकिंत केलेल्या किंवा तसा उद्देश असलेल्या कोणत्याही जागेमधून, त्यांच्या आरपार किंवा त्याच्याखालुन किंवा कोणत्याही रस्त्याखाली असलेल्या कोणत्याही भुयाराखालून किंवा कमानीखालुन नेता येईल, आणि मालकास किंवा भोगवटादारास वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर, अशी नाली शहारातील, किंवा मलजल उत्सर्जनासाठी किंवा वितरणासाठी शहराबाहेरील, कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमीनीखालून नेता येईल.

२. आयुक्तास, ज्या कोणत्याही जमिनीत नगरपालिकेची कोणतीही नाली आधीच कायदेशीररित्या बांधण्यात आली असेल अशा जमिनीवर प्रवेश करता येईल आणि तीत असलेल्या नालीच्या जागी कोणतीही नवीन नाली बांधता येईल किंवा याप्रमाणे बांधलेली नगरपालिकेची कोणतीही नाली दुरुस्त करता येईल किंवा तीत फेरफार

करता येईल.

१५. त्यामधील उपकलम २ हे महत्वपुर्ण असुन त्यानुसार ज्या कोणत्याही जमीनीत नगरपालिकेची नाली आधीच कायदेशीररित्या बांधण्यात आली असते अशा जमीनीवर प्रवेश करता येईल आणि तीत असलेल्या नालीच्या जागी कोणतीही नवीन नाली बांधता येईल किंवा याप्रमाणे बांधलेली नगरपालिकेची कोणतीही नाली दुरुस्त करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल. त्यामुळे एकुणच आलेल्या तथ्यावरुन व दस्तावरुन असे दिसुन येते की, ती ड्रेनेज अगोदरच बांधलेली आहे. त्यामुळे जरी, त्यावर प्रतिवादी मनपाचा मालकी हक्क नसला तरीही, जर ते तुंबले असेल तर, ते दुरुस्त करण्याचे संपुर्ण अधिकार त्यांना आहेत व त्यावर अतिक्रमण करण्याचा अथवा अडथळा निर्माण करण्याचा वादीला कुठलाही अधिकार नाही. म्हणून वादी यास कुठलीही प्रथमदर्शनी केस नसुन दाव्याचा समतोल सुध्दा त्याच्या बाजुने नाही.

१६. वाद मिळकतीच्या एकुण क्षेत्रफळाविषयी प्रतिवादी क्र. ५ ते ८ च्या वकीलांनी तीव्र हरकत घेतली. त्यांच्या युक्तीवादानुसार वाद कथनामध्ये वादीने वाद मिळकतीचे एकुण क्षेत्रफळ हे ०० हे ०२ आर. बांधीव घर व घरामागील ५२८ चौ. फुट व घराच्या बाजुची ५२८ चौ. फुट जागा असे दर्शविलेले आहे. म्हणजेच एकुण ३ आर. वाद मिळकतीचे क्षेत्रफळ वादीच्या म्हणण्यानुसार येत आहे. परंतु, प्रत्यक्षात वादी हा फक्त २ आर.

मिळकतीचा मालक आहे. त्यामुळे त्या एकाच कारणास्तव वाद मिळकतीचे वर्णने अचुक नसल्याने तसेच, वादी हाच १ गुंठयाचा अतिक्रमण धारक असल्याने प्रथमदर्शनी त्याला दावा दाखल करण्याचा व हरकत घेण्याचा प्रश्न निर्माण होत नाही, असा युक्तीवाद केला, तसेच, जी ड्रेनेज लाईन आहे, ती वादीच्या मिळकतीमध्येच नाही. याउलट, वादीच्या वकीलांच्या युक्तीवादानुसार मिळकतीचे वर्णन अचुक असुन २ आर. क्षेत्रफळावरील बांधीव घर असुन ते संपुर्ण २ आर. क्षेत्रफळावर नाही. २ आर. क्षेत्राफळाच्या काही भागावर आहे. त्यामुळे ड्रेनेज लाईन त्याच्याच मालकीच्या जागेत वैयक्तिक आहे. थोडयावेळाकरीता, वादीच्या युक्तीवादानुसार मान्य केले की, ड्रेनेज लाईन ही त्याच्या २ आर. मालकीच्या क्षेत्रफळात आहे. परंतु, ती खाजगी ड्रेनेज लाईन आहे, हे कोठेही पटलावर आले नाही. वास्तविकतः वाद कथनाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये वादीने स्पष्टपणे नमुद केले आहे की, ‘'वादीने त्यांची ड्रेनेज लाईन पुढे मनपाच्या ड्रेनेज लाईनला जोडली असल्यामुळे, सदरच्या ड्रेनेजची वादीस आवश्यकता नव्हती'’. म्हणजेच याचा अर्थ वादीच्या घराच्या मागच्या बाजुस ड्रेनेज लाईन अस्तित्वात आहे. ती वादीच्या मालकीच्या जागेत आहे की, मनपाने संपादित केलेल्या जागेत आहे, हा येथे प्रश्नच नाही. त्या जागेवर मनपाची ड्रेनेज लाईन आहे, हे महत्वाचे आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिमाचे कलम १६९ व १७० नुसार एखादी ड्रेनेज लाईन मग ती महानगरपालिकेच्या खर्चाने बांधलेली, बसवलेली, उभारलेली असो किंवा नसो, ती साफ करण्याची, पाण्याने धुवुन काढण्याची, रिकामी

करण्याची व्यवस्था आयुक्तांकडून करण्यात आली पाहिजे, असे स्पष्टपणे नमुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिमाचे कलम १६९ पुढीलप्रमाणे–

१६९. केवळ मालमत्तेच्या वापरासाठी नाल्या विहीत होणे व त्या सुस्थितीत राखणेः–

कलम १५३, पोट–कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहुन, बांधलेली, बसवलेली, उभारलेली किंवा सुरु केलेली किंवा जागेच्या किंवा जागांच्या समुहाच्या केवळ वापरासाठी व फायदयासाठी चालु ठेवलेली प्रत्येक नाली मग ती महानगरपालिकेच्या खर्चाने बांधलेली, बसवलेली, उभारलेली किंवा सुरु केलेली असो वा नसो–

अ) कलम १७० मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, नियत दिवशी व दिवसापासून अशा जागेच्या किंवा जागांच्या गटाच्या मालकाकडे निहित होईल;

ब) तिचा अधिक परिणामकारक रितीने उपयोग व्हावा म्हणून आयुक्तास आवश्यक वाटतील अशी आणखी सर्व उपयंत्रे व जोडणीकामे यांची तरतुद तीत करण्यात आली पाहिजे. तसेच, ती अशा जागांच्या किंवा जागांच्या समुहाच्या मालकाकडून चांगल्या दुरुस्त स्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवण्यात आली पाहिजे आणि नगरपालिका निधीतून खर्च करुन वेळोवेळी ती पाण्याने धुऊन काढण्याची, साफ करण्याची व रिकामी करण्याची आयुक्ताकडून व्यवस्था करण्यात आली पाहिजे.

१७. वरील कायदेशीर तरतुदींनुसार वादीला ती ड्रेनेज लाईन साफ करण्यास अडविण्याचा कुठलाही हक्क व अधिकार नाही. सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न उपस्थित होत असल्यामुळे व सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने जर ते तुंबलेले ड्रेनेज साफ केल्यास वादी यांना कुठलेही नुकसान होणार नाही, उलट प्रतिवादी यांना नुकसान होईल. त्यामुळे

मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

मुद्दा क्र. ४ करिता

१८. मुद्दा क्र. १ ते ३ च्या नकारार्थी निष्कर्षान्वये मुद्दा क्रमांक ४ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

आदेश

१. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. न्यायहितास्तव वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ८ या दोघांनाही असे आदेशीत करण्यात येते की, त्यांच्या घरामागे असलेल्या ड्रेनेज लाईनवर कोणतेही तात्पुरते अथवा पक्के बांधकाम करु नये, तसे बांधकाम असल्यास स्वतःच्या खर्चाने काढुन घ्यावे. ते बांधकाम/अडथळा न काढल्यास प्रतिवादी क्र. १ ते ४ (मनपा) यांना ते काढुन घेण्याचा पुर्ण अधिकार राहिल व ते साफ करण्यास वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी कुठलाही अडथळा निर्माण करु नये.

३. खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

सही/-

आकुर्डी (विनोद संतोष डामरे)

दिनांक - २१/०७/२०२६. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आकुर्डी, पुणे.

CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order.

Name of Stenographer	:-	Gaurav A. Bobade (Grade III)
Court Name	:-	Shri. V. S. Damare, Civil Judge Junior Division, (P.C.M.C.), Court, Akurdi, Pune.
Date	:-	21/07/2026.
Order signed by presiding officer on	:-	21/07/2026.
Order uploaded on	:-	21/07/2026.